साक्षीदार क्र **०१** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–रविंद्र अशोक वांढरे,
वय ३१ वर्ष, व्यवसाय–मजुरी,
राह.पिपरा, ता.उमरेड, जि.नागपूर.

**<u>सरतपासणी सरकारी वकील श्री.जे.एम.बोरकर यांच्या मार्फत शपथेवर सुरू</u>**

१. पोलिसांनी मला पंचनामा करण्याकामी समन्सपत्र दिले नव्हते. आता मला समन्स पत्र दाखविण्यात आले त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहिती नाही. सहीला **निशाणी क्र.१३** देण्यात आला. पोलिसांनी माझ्यासमक्ष कोणताही पंचनामा केला नाही. आता मला पंचनामा दाखविण्यात आला त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहीत नाही. सहीला **निशानि क्र.१४** देण्यात आले. पोलिसांनी माझे फोटो काढले होते. आता मला फोटो दाखविण्यात आला त्यामध्ये माझा फोटो आहे त्यास **आर्टीकल अ** देण्यात आला.

**<u>सदर साक्षीदार अभियोग पक्षास कोणत्याही मुद्दयावर सहकार्य करीत नसल्याने त्यास उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली असता, परवानगी देण्यात येते.</u>**

२. हे म्हणणे खरे नाही की, दि.१३/१२/२०२२ रोजी मौजा पिपरा येथे पोलिसांनी मला घटनास्थळावर पंचनामा करण्याकामी बोलविले होते व आरोपीच्या ताब्यातुन १८० मिलीच्या एकूण २७ देशी दारूच्या निपा जप्त केल्या होत्या व माझ्यासमक्ष घटनास्थळ व जप्ती पंचनामा तयार केला मला वाचुन दाखविला त्यातील मजकूर खरा व बरोबर असल्याची खात्री करून मी त्यावर सही केली. आता मला माझ्या बयाणातील **अधोरेखांकित भाग अ** वाचुन दाखविण्यात आला तो पोलिसांनी माझ्या सांगण्याप्रमाणे लिहीलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी ओळखीचा असल्यामुळे त्याला वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**<u>सरतपास संपला.</u>**
**<u>आरोपीतर्फे ॲड.श्री.एस.एच.शास्त्रकार यांनी उलटतपास नाकारला.</u>**
**<u>फेरतपास काही नाही.</u>**

वा.दा.ब.अ.सा. | समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि.१७.११.२०२५

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड